एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ (सीपीटीपी-१२) अंतर्गत राज्य सेवा परीक्षा-२०२४ द्वारे शिफारसप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना प्रशिक्षाणासाठी जिल्हा वाटप करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश, क्र. सीपीटीपी-०५२६/प्र.क्र.११७/आस्था-०२ (E-1674963)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ०७ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दि.२०.०१.२०१४
२)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन-०४२४/प्र.क्र.३७/प्रशि-१, दि.०१.०८.२०२५
१) कार्यालयीन आदेश, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन-०५२६/प्र.क्र.४३/प्रशि-२, दि.२८.०७.२०२६.

<u>शासन आदेश</u>:-

एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत राज्य सेवा परीक्षा-२०२४ द्वारे शिफारसप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना सीपीटीपी-१२ या तुकडीमध्ये प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानुषंगाने, सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन क्र.३ येथील आदेशान्वये एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत सीपीटीपी-१२ या तुकडीमध्ये उप जिल्हाधिकारी संवर्गातील ०७ उमेदवारांना सोमवार, दि.१०.०८.२०२६ पासून दोन वर्षाच्या प्रशिक्षणासाठी परिविक्षाधीन अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे.

२. संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राज्यसेवा परीक्षा-२०२४ च्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त ठरलेल्या गट अ व गट ब मधील उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीचा एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ करिता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णया मधील तरतूदी विचारात घेऊन उप जिल्हाधिकारी संवर्गातील ०७ उमेदवारांना खातेनिहाय जिल्हा संलग्नता या टप्प्यातील प्रशिक्षणासाठी जिल्हा वाटप करण्याबाबत कळविले आहे.

३. त्यानुषंगाने एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत सीपीटीपी-१२ या तुकडीमध्ये उप जिल्हाधिकारी संवर्गातील ०७ उमेदवारांना खातेनिहाय जिल्हा संलग्नता या टप्प्यातील प्रशिक्षणासाठी खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून जिल्हा वाटप करण्यात येत आहे.

अ. क्र.	परिविक्षाधीन उप जिल्हाधिका-यांचे नाव	प्रशिक्षणासाठी जिल्हा	
		वाटप करण्यात आलेला जिल्हा	विभाग
१)	श्री.विजय नागनाथ लामकाने	लातूर	छत्रपती संभाजीनगर
२)	श्री.भाबड रविंद्र बाळासाहेब	छत्रपती संभाजीनगर	छत्रपती संभाजीनगर
३)	श्री.अमित गोकुळ लोकरे	नागपूर	नागपूर
४)	श्रीमती जाधव आरती परमेश्वर	धाराशिव	छत्रपती संभाजीनगर
५)	श्री. पवन नागनाथ मंगरुळे	अमरावती	अमरावती
६)	श्री.मानतेश पिरगोंडा पाटील	नागपूर	नागपूर
७)	श्रीमती प्रिती बाजीराव वाळेकर	मुंबई उपनगर	कोकण

(१) उपरोक्त परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांना विविध विभागांतर्गत खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षण व स्वतंत्र कार्यभार प्रशिक्षण कार्यक्रमासंदर्भात स्वतंत्र पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार, संबंधित जिल्हाधिकारी यांनी परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांचा दि.१०.०८.२०२६ पासून प्रशिक्षण कार्यक्रम तात्काळ तयार करावा व त्याची प्रत परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करून द्यावी.

(२) परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांनी दैनंदिन रोजनिशी दररोज न चुकता ई-मेलद्वारे संबंधित जिल्हयातील निवासी उप जिल्हाधिकारी व संपर्क/ समन्वय अधिकारी, सह आयुक्त (महसूल) यांना सादर करावी.

(३) विभागाचे नोडल अधिकारी व प्रशिक्षण संस्थांचे संपर्क अधिकारी यांनी प्रशिक्षणार्थीवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवावे. तसेच, प्रशिक्षणार्थींवर प्रत्येक महिन्यात केलेल्या कामकाजाचे मूल्यमापन व अनुभवाच्या आधारावर मासिक अहवाल घ्यावा व सदर अहवालाचे मूल्यमापन करावे. प्रत्येक महिन्यास याचा अहवाल प्रमाणित करून सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावा.

(४) परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांच्या दैनंदिन उपस्थिती/ अनुपस्थिती/ वर्तन इ. बाबत संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी समन्यय अधिकारी, सह आयुक्त (महसूल) यांना अहवाल सादर करावा.

(५) प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थीने गैरवर्तन केल्याचे अथवा प्रशिक्षण पुरेशा गांभीर्याने घेत नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा घटना त्वरित संबंधित जिल्हाधिकारी यांनी समन्वय अधिकारी/ विभागाचे नोडल अधिकारी व प्रशिक्षण संस्थांचे संपर्क अधिकारी तसेच सह आयुक्त (महसूल) यांच्याशी संपर्क साधून निदर्शनास आणून देण्यात याव्यात. या संबंधित अहवाल समन्वय अधिकारी सह आयुक्त (महसूल) यांनी शासनाच्या महसूल व वन विभाग व सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

(६) परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांना प्रशिक्षणासाठी वाटप केलेल्या विभागातील विभागीय आयुक्त यांच्या आस्थापनेवर अधिसंख्य पदे निर्माण करण्यात येत आहेत. प्रशिक्षणार्थीना वाटप केलेल्या विभागातील परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांचे वेतन व भत्ते संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत अदा करण्यात येतील.

(७) खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणा-या परीक्षा प्रशिक्षणार्थींनी विहित मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच, प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(८) विभागीय प्रशिक्षणाच्या टप्प्यांमध्ये परिविक्षाधीन उप जिल्हाधिकाऱ्यांचे मुल्यमापन करण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएन-०४२४/प्र.क्र.३७/प्रशि-१, दि.०१.०८.२०२५ मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी समन्वय अधिकारी सह आयुक्त (महसूल) यांची राहील.

(९) शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्र.संकीर्ण-०४१५/प्र.क्र.१२२/ई-२, दि.१५.०९.२०१५ नुसार परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांना वाटप केलेल्या विभागातील समन्वय अधिकारी म्हणून सहआयुक्त (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार समन्वय अधिकारी सह आयुक्त (महसूल) यांनी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी योग्य ती दक्षता घ्यावी.

(१०) परिविक्षाधीन उप जिल्हाधिकाऱ्यांना केवळ प्रशिक्षणासाठीच जिल्हा वाटप करण्यात येत आहे.

(११) परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांना प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रशिक्षणासाठी वाटप केलेल्या जिल्ह्यात दि.१०.०८.२०२६ पासून रुजु व्हावे व तसा अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

(१२) सदर जिल्हा संलग्नता ही सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०१.०८.२०२५ रोजीच्या आदेशामधील परिच्छेद ४ येथे नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहील..

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०२६०८०७१३०२५७९८४८ असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.08.07 16:39:11 +05'30'

(महेश वरुडकर)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) महासंचालक, यशदा, पुणे.
३) सर्व विभागीय आयुक्त.
४) सर्व संबंधित जिल्हाधिकारी.
५) उप सचिव (सीपीटीपी), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) संबंधित परिविक्षाधिन उप जिल्हाधिकारी.

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) संबंधित जिल्हाधिकारी.
७) प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
८) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९) संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
१०) संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
११) संबंधित परिविक्षाधिन उप जिल्हाधिकारी (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
१२) उप सचिव (आस्था-०२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१३) निवडनस्ती (आस्था-०२).